

# दोन्ही पक्षांनी फसविले तरी

# मराठा समाज विजयोत्सव साजरा करणार का?

**संपादकीय**

**जयश्री खाडिलकर-पांडेकृत**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनी शिंगणापूरच्या सभेत म्हटले की, मराठा समाजाने एक डिसेंबरला विजयोत्सव साजरा करावा! त्यांनी हे वाक्य उच्चारले आणि दोन दिवसांत मागासवर्गीय आयोगाने मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबतचा अहवाल सरकारला सादर केला. हा अहवाल गोपनीय आहे असे सरकार सांगत असतानाच या आयोगाचे एक सदस्य डॉ. राजेश कर्पे प्रत्येक वाहिनीला खास मुलाखत देत अहवालातील 'आवश्यक' माहिती सांगत सुटले होते. या सर्व घडामोडींनंतर आरक्षण मिळेलच अशी शंभर टक्के खात्री झाली आहे का? तर मुळीच खात्री झालेली नाही. या सर्व घडामोडींनंतर एकच स्पष्ट झाले की, मराठा समाजाची मतं जातील अशी भाजपाला भीती वाटू लागली आहे. त्यामुळे काँग्रेस राष्ट्रवादी सरकारने २०१४ च्या निवडणुकीपूर्वी आरक्षणाचा अध्यादेश काढून स्वप्न दाखविले तसाच प्रकार २०१९ च्या निवडणुकीच्या तोंडावर भाजपा करीत आहे. काँग्रेस आणि भाजपा या दोन्ही पक्षांनी मराठा समाजाची फसवणूक केली हे स्फटिकासारखे स्पष्ट आहे. तरीही मराठा समाज मुख्यमंत्र्यांच्या सांगण्यानुसार विजयोत्सव साजरा करणार आहे का?

मुख्यमंत्र्यांनी विजयोत्सव साजरा करा हे वाक्य उच्चारल्यावर हा उत्सव दणक्यात साजरा होईल हे निश्चित आहे. मराठा समाजासमोर हे विजयाचे भव्यदिव्य दृश्य उभे करणे ही भाजपासाठी काळाची गरज आहे. या गरजेपोटी भाजपाचे कार्यकर्ते कामाला लागतील हे आपण समजू शकतो. मात्र मराठा समाजाने त्यांच्या मागे फरफटत जायचे की नाही हा निर्णय समाजाने घेणे गरजेचे आहे. कोणताही पक्ष येतो, बनाव करतो आणि समाज त्यांच्यामागे वाहवत जातो असे चित्र निर्माण झाले तर आरक्षणाच्या अंतिम उद्देशासाठी ते अतिशय घातक ठरेल.

२०१४ सालच्या निवडणुकीपूर्वी मराठा समाजाच्या मतांसाठी काँग्रेसने घाईने आरक्षणाचा अध्यादेश काढला. हा अध्यादेश न्यायालयात टिकला नाही म्हटल्यावर तितक्याच घाईने नारायण राणे यांची समिती नेमली. या समितीने तुफान वेग दाखवीत २९ दिवसांत अहवाल तयार केला आणि मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण मिळावे अशी शिफारस केली. मराठा समाजाचे सर्वेक्षण इतक्या कमी दिवसांत होऊ शकत नाही, असा आक्षेप मराठा याचिकाकर्त्यांनी न्यायालयात घेतला. दरम्यान, विधानसभा निवडणुका आल्या. आम्ही सत्तेवर येताच महिनाभरात मराठा आणि धनगरांना आरक्षण देऊ असे भाजपा नेते प्रत्येक व्यासपीठावर छाती फुगवून सांगत होते. या एका घोषणेने भाजपाने मराठा आणि धनगर समाजाची मते घेतली. मात्र सत्तेवर आल्यानंतर पक्षाची भाषा आणि नीती बदलली.

धनगर समाजाचा कमकुवत नेता महादेव जानकरना कळपात घेतल्याने त्यांचा आवाज जो बंद झाला तो अजूनही फुटलेला नाही. महादेव जानकर विधानसभा लढले तर शंभर टक्के पराभूत होणार आहेत. दुसरे नेते राम शिंदे यांच्या कपड्याची इस्त्रीही बिघडत नाही. त्यामुळे त्यांच्याकडून अपेक्षाच नाही. प्रकाश शेंडगे यांच्यासारख्या नेत्याने काँग्रेसमध्ये असताना काही काम केले नाही तसे भाजपातही केले नाही. धनगर समाजाचे नेतृत्त्व सोडा त्यांच्या मतदारसंघातही त्यांना ओळखत नाहीत. धनगर समाजाची ही अवस्था असल्याने सरकार बेफिकीर आहे. धनगर समाजाचे सर्वेक्षण टाटाच्या संस्थेकडे सोपवून सरकार गोधडी पांघरून झोपले. टाटाच्या समितीमधील एखाद्याने आरक्षण विरोधी आवाज काढला तर त्याला बदलून दुसऱ्याला नेमायचे इतकाच उद्योग भाजपा सरकारने चार वर्षे केला. आता निवडणूक जवळ आल्यावर मराठ्यांच्या धाकामुळे मुख्यमंत्र्यांना पावले उचलून मराठा आरक्षणाचे नियोजन करावे लागले. पण धनगर आरक्षणाबाबत अवाक्षर बोलले जात नाही.

भाजपा राज्यात सत्तेवर आल्यानंतर महिना उलटल्यावरही मराठा आरक्षणाबाबत काहीच हालचाल नव्हती. नारायण राणे समितीने केलेला अहवाल हाताशी होता, पण राणे तेव्हा भाजपात नव्हते या 'राजकीय' कारणाने सरकारने हा अहवाल मानला नाही. भाजपा सरकार सत्तेच्या स्वप्नात रमले होते. मात्र अचानक मराठा समाजाने मूक मोर्चे काढण्यास सुरुवात केली. या मोर्च्यांमुळे सरकारची झोप उडाली नााही, पण किलकिल्या डोळ्यांनी सरकार मोर्च्यांकडे पाहू लागली. दुर्दैवाने पहिले दहा मोर्चे निघाल्यावरही सरकारने हालचाल केली नाही. शेतकरी, कामगार, शिक्षक अशा कोणत्याही घटकाने त्यांच्या हक्काच्या मागण्यांसाठी मोर्चे काढले की त्या मागण्यांचा विचार न करता ते मोर्चे मोडून काढण्याचे षड्यंत्र रचण्यात सरकार दंग होते. आपलीच माणसे आंदोलनात पेरायची, त्यांनाच चर्चेला बोलवायचे आणि आंदोलन संपवायचे ही सरकारची कूटनीती यशस्वी ठरत होती. त्यामुळे मराठा आंदोलनही मोडून काढू या धुंदीत सरकार होते.

नारायण राणेंचा अहवाल हा वैधानिक नाही, त्याला कायदेशीर मान्यता नाही हे न्यायालयात २०१४ सालीच स्पष्ट झाले होते. भाजपा सत्तेवर आल्यानंतर याबाबतीत पुढे काहीच केले गेले नाही. मराठा समाजाची तोडमोड करता येत नाही म्हटल्यावर दोन वर्षांनी भाजपाने मागासवर्गीय आयोग स्थापन केला आणि त्याना पुन्हा सर्व्हे करण्यास सांगितले. हीसुद्धा थापच होती. कारण आयोग अस्तित्त्वात आला तरी प्रदीर्घकाळ त्याला अध्यक्षच नव्हता. मराठ्यांचा दबाव खूपच वाढल्यावर शेवटी न्या. एम. जी. गायकवाड यांची नेमणूक झाली.

मराठा समाजाचे सर्वेक्षण सुरू झाले, पण अहवाल कधी येईल याचे उत्तरच नव्हते. न्यायालयात आणि आयोगात फक्त 'तारीख पे तारीख' काम सुरू होते. मात्र निवडणूक आली, मोदींचे वारे ओसरले आणि मतं सावडण्याची धडपड सुरू झाली. सरकार खडबडून जागे झाले. आयोगाला निधी, टेबल, खुर्च्या पोहचल्या आणि लवकरात लवकर अहवाल यावा यासाठी दबाव सुरू झाला. मग आयोगाने प्रश्नावली तयार केली आणि गावागावांतील मराठा समाजाकडून ही ५० आणि १०० प्रश्नांची प्रश्नावली भरून घेतली. प्रामुख्याने त्यावरच विसंबून अहवाल तयार केला. प्रश्न असा आहे की, जे आयोगाने केले तेच २०१४ साली नारायण राणेंनी केले होते. त्यांनीही प्रश्नावली तयार केली. जिल्हाधिकाऱ्यांपासून सरपंचापर्यंत सर्वांना कामाला लावले. प्रश्नावली धडाधड भरून घेतल्या गेल्या. गावागावांत सरकारी अधिकाऱ्यांनी फिरून फॉर्म भरायला लावले. जे राणे समितीने केले तीच पद्धत आयोगाने स्वीकारली. त्यामुळे दोन्ही अहवाल सारखेच असणार आहेत. मग अहवाल स्वीकारायला तीन वर्षे कशाला घेतली? हे सगळे आधी करता येत होते तरी केले का नाही?

नारायण राणेंचा अहवाल कोर्टात सादर झाल्यावर याचिकाकर्त्यांनी त्याविरोधात युक्तिवाद करून स्थगिती मिळविली. मागच्याला ही ठेच लागल्याने भाजपाने या वेळी अहवाल स्वीकारून आरक्षण जाहीर करताना कोर्टात कॅव्हिएट देण्याची तयारी केली आहे. ज्यामुळे सरकारचा युक्तिवाद ऐकल्याशिवाय स्थगिती देता येणार नाही. या युक्तीचा फायदा घेऊन आरक्षण मिळाले असे जाहीर करीत विजयोत्सव साजरा केला जाणार आहे. मराठा समाज या प्रदर्शनाने फसला तर त्याच्या मतावर भाजपा गब्बर होईल आणि जशी निवडणूक संपेल तसे सरकार पुन्हा झोपी जाईल.

मुख्य प्रश्न आरक्षण कोणत्या प्रवर्गात देणार हा आहे. मराठ्यांना ओबीसीत आरक्षण दिले तर ओबीसींची मते जातील हे ओळखून त्याबाहेर आरक्षण दिले जाईल. म्हणजे सध्याच्या ५० टक्क्यांच्या वर मराठा समाजाला आरक्षण घोषित होईल. हे आरक्षण कायद्याच्या चौकटीत कसे टिकेल? ५० टक्क्यांच्या वर आरक्षण द्यायचे तर त्याला विशेष स्थिती आहे हे पुराव्यासहित सिद्ध करावे लागते. हे शक्य नसेल तर केंद्र सरकारला घटनेत आवश्यक बदल करावा लागणार आहे. या दोन्ही गोष्टी सहज घडणार नाहीत. त्यासाठी मराठा समाजाला सतत प्रचंड ताकदीने लढावे लागेल. तामिळनाडूत ५० टक्क्यांच्या वर ७२ टक्केपर्यंत आरक्षण दिले आहे. पण हे देताना विशेष बाब म्हणून हे जादा आरक्षण दिले हे सिद्ध करता आलेले नाही. सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा सर्वेक्षण करण्यास सांगितले आहे. पण पुन्हा सर्वेक्षणाचा उपयोग होणार नाही हे माहीत असल्याने गेली १५ वर्षे तामिळनाडूचे कोणतेच सरकार त्या भानगडीत पडलेले नाही. त्यामुळे आरक्षण दिले, मात्र अंमलबजावणी नाही अशी तामिळनाडूत स्थिती आहे. यावर उपाय म्हणजे केंद्र सरकारने घटनेत बदल करायला हवा. तेही घडलेले नाही.

तामिळनाडूत जे झाले तेच महाराष्ट्रात होईल. नारायण राणेंचा अहवाल फेटाळून तसाच असलेला आयोगाचा अहवाल कायदेशीर आहे म्हणत स्वीकारणे इतकेच या सरकारने ४ वर्षांत केले. निवडणुकीच्या तोंडावर अहवाल स्वीकारणे हे पुढचे पाऊल मतांच्या जोगव्यासाठी आहे. जे काँग्रेसने केले तेच भाजपा करीत आहे. दोन्ही पक्षांनी मराठा समाजाला फसविण्याचा प्रयत्न चालविला आहे, हेच अंतिम सत्य आहे. त्यामुळे भाजपासह विजयोत्सव साजरा करून तलवार म्यान करायची की सर्वांगाने विचार करून सरकारच्या मानेवर तलवार धरून अंतिम आरक्षणाच्या करिता लढा सुरू ठेवायचा याचा निर्णय मराठा समाजाने घ्यायचा आहे. या निर्णयावरच भविष्य अवलंबून आहे.